# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 06/08/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

महाराष्ट्र पोलीस

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 मी/आजिव/पो.कर्म-हजर/ 2020 6428
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 14 AUG 2020

## आ दे श

पोलीस अधिक्षक, महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग नागपुर यांचे पत्र क्रमांक पोअ/मपोप्राविना/म.पो.केन्द्र-उमरखेड/पो.कर्म/प्रत्यावर्तन/1390/2020 दिनांक 15/07/2020 अन्वये पोना/2437 दिनेश चव्हाण यांना महामार्ग पोलीस मदत केंद्र उमखेड येथुन या आस्थापनेवर हजर होणे करिता दिनांक 19/07/2020 रोजी कार्यमुक्त करण्यात आल्याने ते या आस्थापनेवर दिनांक 03/08/2020 रोजी हजर झाले आहेत.

पोना/2437 दिनेश चव्हाण यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात आले असुन त्यांची नेमणुक, पो.मु.यवतमाळ येथे करण्यात येत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

पोना/2437 दिनेश चव्हाण नेमणुक, पो.स्टे पो.मु.यवतमाळ

मार्फत :- प्रभारी अधिकारी पोलीस नियत्रंण कक्ष, यवतमाळ/राखीव पोलीस निरीक्षक, पो.मु.यवतमाळ

प्रत :- वेतन लिपीक-1/आस्थापना लिपीक-5/राजपत्र लिपीक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस :- पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ

प्रत अग्रेपित- :- पोलीस अधिक्षक, महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, नागपुर

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/पदोन्नती/पोना-पोहवा/ /2020
पोलिस अधीक्षक यवतमाळ. यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दुरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ. दिनांक :- 6 AUG 2020

## आ दे श

या कार्यालयाचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार या पदावर वेतन संरचना 26400-83600 विशेष वेतन 450/- मध्ये जेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातुन खालील नमुद अटिंचे अधिन राहुन निवळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक 01/08/2020 पासुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नती नंतर ते सद्या ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्याच ठिकाणी कार्यरत राहतील.

सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात, सेवाजेष्ठतेनुसार खुला प्रवर्गातील रिक्त पदावर असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत आहे.

| अ.क्र | बन | पदनाम | पोलीस कर्मचारी यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 528 | पोलीस नाईक | अनिता वाडगुळे | खुला जेष्ठतेनुसार | पो.मु.यवतमाळ |
| 02 | 499 | पोलीस नाईक | मुरलिधर वंजारे | खुला जेष्ठतेनुसार | पो.स्टे खंडाळा |

तसेच सदरचु आदेश हे शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-2017/प्र.क्र312A/16 व. दिनांक 18/10/2017 व दिनांक 29/12/2017 मध्ये नमुद केल्यानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचीका क्रमांक 2797/2015 मध्ये दिनाक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती कालावधीत, राज्य शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 तसेच विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन, शासन निर्णय सा.प्र.वि.क्र बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/01/16-ब दिनांक 25/05/2004 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण न देता तुर्तास शासन पत्र साप्रवि दिनाक 29/12/2017 प्रमाणे पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

सदर पदोन्नती हि संपुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत असल्याने न्यायनिर्णय व शासनाचे आदेशानुसार दिलेली पदोन्नती कोणत्याही वेळी रद्द करुन मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक वाशिअ-1214/प्र.क्र 26/11 दिनांक 02/06/2014 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन 2020-2021 च्या वित्तीय वर्षाची माहे मार्च 2020 अखेर पर्यंतची मत्ता व दायित्वची विवरणपत्रे अद्यापही सादर

केले नसल्याने त्यांनी तात्काळ मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे सादर करण्यात यावी. आणि ती त्यांची स्वतःची जवाबदारी राहील जे कर्मचारी मत्ता व दायित्वची विवरणपत्र या कार्यालयास सादर करणार नाही त्यांची पदोन्नती या कारणास्तव कोणत्याही वेळी रद्द करण्यात यईल याची संबधीतांनी नोंद घ्यावी.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांच्या विरुध्द नव्याने गंभीर कसुरी बावत विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालु असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर असे निदर्शनास आल्यास त्यांना पदोन्नती न देता तात्काळ या

महाराष्ट्र पोलीस

6474

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/पदोन्नती/पोहवा-सपोउपनि/ /2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ. दिनांक :- 6 AUG 2020

## आ दे श

या कार्यालयाचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर वेतन संरचना 29200-92300 मध्ये जेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातुन खालील नमुद अटिंचे अधिन राहुन निवळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक 01/08/2020 पासुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नती नंतर ते सद्या ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्याच ठिकाणी कार्यरत राहतील.

सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात, सेवाजेष्ठतेनुसार खुला प्रवर्गातील रिक्त पदावर असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत आहे.

| अ.क्र | बंन | पदनाम | पोलीस कर्मचारी यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 263 | पोहवा | मो.सादिक मो.शमी | खुला जेष्ठतेनुसार | मो.प.वि यवतमाळ |
| 02 | 1535 | पोहवा | संजय दुवे | खुला जेष्ठतेनुसार | स्था.गु.शा |
| 03 | 1556 | पोहवा | सै.मुस्ताक सै.इस्माइल | खुला जेष्ठतेनुसार | जि.वा.शा यवतमाळ |
| 04 | 1250 | पोहवा | लक्ष्मण वरठी | खुला जेष्ठतेनुसार | पो.मु.यवतमाळ |

तसेच सदरहु आदेश हे शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-2017/प्र.क्र312A/16 व, दिनांक 18/10/2017 व दिनांक 19/12/2017 मध्ये नमुद केल्यानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचीका क्रमांक 2797/2015 मध्ये दिनांक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती कालावधीत, राज्य शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 तसेच विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017 वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन, शासन निर्णय सा.प्र.वि.क्र बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/01/16-व दिनांक 25/05/2004 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण न देता तुर्तास शासन पत्र साप्रवि दिनांक 29/12/2017 प्रमाणे पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

सदर पदोन्नती हि संपुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत असल्याने न्यायनिर्णय व शासनाचे आदेशानुसार दिलेली पदोन्नती कोणत्याही वेळी रद्द करुन मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक वाशिअ-1214/प्र.क्र 26/11 दिनांक 02/06/2014 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन 2020-2021 च्या वित्तीय वर्षाची माहे मार्च 2020 अखेर पर्यंतची मत्ता व दायित्वची विवरणपत्रे अद्यापही सादर केले नसल्याने त्यांनी तात्काळ मत्ता व दायित्वांची विवरणरपत्रे सादर करण्यात यावी. आणि ती त्यांची स्वत:ची जवाबदारी राहील जे कर्मचारी मत्ता व दायित्वची विवरणपत्रे या कार्यालयास सादर करणार नाही त्यांची पदोन्नती या कारणास्तव कोणत्याही वेळी रद्द करण्यात यईल याची संवधीतांनी नोंद घ्यावी.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांच्या विरुध्द नव्याने गंभीर कसुरी बाबत विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालु असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर असे निदर्शनास आल्यास त्यांना पदोन्नती न देता तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावे.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीचवाय 1082/सी आर/1100 (2)/एसईआर-3 दिनांक 06/11/1984 अन्वये पदोन्नतीनंतरच्या पदावर वेतन निश्चिती करण्याबाबत विकल्प दयावयाचा असेल तो पदोन्नती दिल्याचे दिनांकापासुन 01 महिण्याच्या आत या कार्यालयास सादर करावा. वेतन निश्चिती करीता दयावयाचा विकल्प 01 महिणेचे आत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम 1981 मधिल नियम 11(1)(ए) आणि शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर 1209/प्र.क्र. 27/सेवा-9 दिनांक 22/04/2009 मधील नियम 13 (ब) (2) अन्वये पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवुन करण्यात येईल.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना कळविण्यात येते की महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/2015/प्र.क्र 303/का.12 दिनांक 12/09/2016 अन्वये जे कर्मचारी सदरची पदोन्नती नाकारणार आहेत अशा कर्मचाऱ्यांना दोन वर्षा पर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करिता विचार करण्यात येणार नाही.

ज्या पोलीस कर्मचारी यांना पदोन्नती नाकारावयाची असेल त्यांनी 07 दिवसांचे आत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

" पदोन्नती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे "

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक यवतमाळ

प्रति,

पोनि स्था.गु.शा/मो.प.वि/जि.वा.शा/मो.प.वि यवतमाळ

02/ संबधित ठाणेदार/शाखा प्रमुख यांनी सदर पदोन्नतीचे आदेश सर्व पोलीस कर्मचारी यांचे समोर गणनेवर वाचुन दाखवावे तसेच ज्या पोलीस कर्मचाऱ्यांने पदोन्नती स्विकारलेली आहे त्या बाबतची नोंद हुद्दावार नोंदवही मध्ये घेवुन त्या बाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :- अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ/पोलीस उपअधिक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीक लेखा शाखा पत्रव्यवहार शाखा, वि.चौ शाखा, प्रवंधक शाखा/सहा.आस्थापना लिपीक 1,3,4/वेतन लिपीक-1/राजपत्र लिपीक/ विभागीय चौकशी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

जावक क्रमांक :- पोअय/आलि-80 सी/पदोन्नती/पोशि-पोना / 6476/2020
पोलीस अधीक्षक यवतमाळ, यांचे कार्यालय एल.आय.ची चौक यवतमाळ
दूरध्वनी क्रमांक :- 07232-256700 फॅक्स नंबर :- 07232-256710
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
यवतमाळ, दिनांक :- 06 AUG 2020

## आ दे श

या कार्यालयाचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस शिपाई यांना पोलीस नाईक या पदावर वेतन संरचना 25500-81100 मध्ये जेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातुन खालील नमुद अटिंचे अधिन राहुन निवळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक 01/08/2020 पासुन पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नती नंतर ते सद्या ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्याच ठिकाणी कार्यरत राहतील.

सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात, सेवाजेष्ठतेनुसार खुला प्रवर्गातील रिक्त पदावर असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत आहे.

| अ.क्र | बंन | पदनाम | पोलीस कर्मचारी यांचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 22 | पोशि | रिना नेरकर | खुला जेष्ठतेनुसार | पो.मु.यवतमाळ |

तसेच सदरहु आदेश हे शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-2017/प्र.क्र312A/16 व. दिनांक 18/10/2017 व दिनांक 19/12/2017 मध्ये नमुद केल्यानुसार मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी याचीका क्रमांक 2797/2015 मध्ये दिनांक 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 दाखल केलेली आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती कालावधीत, राज्य शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्रमांक 33151/2017 तसेच विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक 28306/2017वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन, शासन निर्णय सा.प्र.वि.क्र बीसीसी-2001/1887/प्र.क्र.64/01/16-व दिनांक 25/05/2004 मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण न देता तुर्तास शासन पत्र साप्रवि दिनांक 29/12/2017 प्रमाणे पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

सदर पदोन्नती हि संपुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या आधिन राहुन देण्यात येत असल्याने न्यायनिर्णय व शासनाचे आदेशानुसार दिलेली पदोन्नती कोणत्याही वेळी रद्द करुन मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक वाशिअ-1214/प्र.क्र 26/11 दिनांक 02/06/2014 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सन 2019-2020 च्या वित्तीय वर्षाची माहे मार्च 2019 अखेर पर्यंतची मत्ता व दायित्वची विवरणपत्रे अद्यापही सादर केले नसल्याने त्यांनी तात्काळ मत्ता व दायित्वाची विवरणरपत्रे सादर करण्यात यावी. आणि ती त्यांची स्वत:ची जवाबदारी राहील जे कर्मचारी मत्ता व दायित्वची विवरणपत्रे या कार्यालयास सादर करणार नाही त्यांची पदोन्नती या कारणास्तव कोणत्याही वेळी रद्द करण्यात यईल याची संवधीतांनी नोंद घ्यावी.

**वर नमुद पोलीस कर्मचारी यांना आता निलंबित केले असेल किंवा त्यांच्या विरुध्द नव्याने गंभीर कसुरी बाबत विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा न्यायालयात खटला चालु असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असेल किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर असे निदर्शनास आल्यास त्यांना पदोन्नती न देता तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावे.**

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीचवाय 1082/सी आर/1100 (2)/एसईआर-3 दिनांक 06/11/1984 अन्वये पदोन्नतीनंतरच्या पदावर वेतन निश्चीती करण्यावावत विकल्प दयावयाचा असेल तो पदोन्नती दिल्याचे दिनांकापासुन 01 महिण्याच्या आत या कार्यालयास सादर करावा. वेतन निश्चिती करीता दयावयाचा विकल्प 01 महिणेचे आत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास पदोन्नती पदावरील वेतन निश्चीती म.ना.सेवा (वेतन) नियम 1981 मधिल नियम 11(1)(ए) आणि शासन अधिसुचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर 1209/प्र.क्र. 27/सेवा-9 दिनांक 22/04/2009 मधील नियम 13 (व) (2) अन्वये पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवुन करण्यात येईल.

वर नमुद पोलीस कर्मचारी यांना कळविण्यात येते की महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही/2015/प्र.क्र 303/का.12 दिनांक 12/09/2016 अन्वये जे कर्मचारी सदरची पदोन्नती नाकारणार आहेत अशा कर्मचाऱ्यांना दोन वर्षा पर्यंत त्यांना त्यांचे पदोन्नती करिता विचार करण्यात येणार नाही.

ज्या पोलीस कर्मचारी यांना पदोन्नती नाकारावयाची असेल त्यांनी 07 दिवसांचे आत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने अर्ज या कार्यालयास सादर करावा.

" **<u>पदोन्नती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे पदोन्नती झाल्याबद्दल आमचे तर्फे अभिनंदन करण्यात येत आहे</u>** "

**(एम.राज कुमार)**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**

प्रति.

ठाणेदार पो.स्टे राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ

02/ संवधित ठाणेदार/शाखा प्रमुख यांनी सदर पदोन्नतीचे आदेश सर्व पोलीस कर्मचारी यांचे समोर गणनेवर वाचुन दाखवावे तसेच ज्या पोलीस कर्मचाऱ्यांने पदोन्नती स्विकारलेली आहे त्या वावतची नोंद हुद्दावार नोंदवही मध्ये घेवुन त्या वावतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :- अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ/पोलीस उपअधिक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीक लेखा शाखा पत्रव्यवहार शाखा, वि.चौ शाखा, प्रवंधक शाखा/सहा.आस्थापना लिपीक 1/वेतन लिपीक-1/राजपत्र लिपीक/विभागीय चौकशी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव

# भाग २ - रजा

क्रमांक :-पोअय/सआली-5/सिक/प. रजा/2020/6460 यवतमाळ दिनांक- 5 AUG 2020

<u>आदेश</u>

या कार्यालयाचे आदेश क्र.पोअय/सआली-५/सिक/परावर्तीत रजा/२०२०/४९१४/दिनांक-२३/६/२०२०/अन्वये मपोशी/२५८६,आरती घोगरकर/नेमणुक-पुसद शहर.यांची दि.३०/३/२०२०/ते १५/०४/२०२०पर्यत १६ दिवस विनावेतन रजा मंजुर करण्या बाबत केलेली विनंती अमान्य करण्यात येत आहे.

(मा.पोलीस अधिक्षक यांचे मान्यतेने)

(सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधिक्षक यवतमाळ करिता

प्रति,
पोनि.पो.स्टे.पुसद शहर.

प्रत,
वेतन लिपीक-१ यांना व्दिप्रतीत /डिपीजी लिपीक यांना योग त्या कार्यवाहीस.

क्रमांक :पोअग्र/डीपी/३१-बी/अनधिकृत गैरहजर/पोना ७२७ राठोड/ 6490 /२०२० यवतमाळ दिनांक
06 AUG 2020

## आ दे श

खालील नमूद पोलीस कर्मचारी कोणत्याही प्रकारची लेखी,तोंडी सुचना न देता नमुद दिनांकाचे कालावधीमध्ये कर्तव्यावरुन अनधिकृतपणे गैरहजर होते. करीता त्यांची गैरहजर कालावधी कसुरी अहवालानुसार बिनपगारी रजा (असाधारण रजा) मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्म.चे नांव व पदनाम | पो.स्टे. / नेमणूक | गैरहजेरीचा कालावधी | आदेश |
|---|---|---|---|---|
| १ | पोना/७२७ युवराज राठोड (सध्या बडतर्फ) | पो.मु. यवतमाळ | दि. ३०/९/२०१९ ते १९/५/२०२० पर्यंत एकुण २३३ दिवस कर्तव्यावरुन अनधिकृत गैरहजर असल्याबाबत. | एकुण २३३ दिवस गैरहजर कालावधी बिनपगारी रजा (असाधारण रजा) मंजुर करण्यात येत आहे. |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

प्रति,

पोना/७२७ युवराज राठोड (सध्या बडतर्फ), पो.मु.यवतमाळ

प्रत, वेतन लिपीक-१/डीपीजी लिपीक/ आस्था लिपीक/सआली २ /रापोनि,पो.मु.यवतमाळ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्रमांक :पोअय/प्रलि.८०-सी/वेतनवाढ-सपोनि.रणधीर/ 6486 /२०२०, यवतमाळ, दिनांक :- 6 AUG 2020

## आदेश

श्री.नरेश रमेश रणधीर, सहायक पोलीस निरीक्षक, जि.यवतमाळ यांना या कार्यालयाचे आदेश दिनांक ०९/११/२०१७ अन्वये एक वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांना या कार्यालयाचे आदेश दिनांक २८/०६/२०१८ अन्वये दोन वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) देण्यात आलेली आहे. श्री.रणधीर यांची, दि.०९/११/२०१७ च्या अनुषंगाने दिनांक ०१/०७/२०१८ ची वेतनवाढ रोखण्यात आली होती. सदर शिक्षेचा कालावधी दि.३०.०६.२०१९ रोजी पूर्ण झाला असल्याने त्यांची खालीलप्रमाणे वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

**वेतन मॅट्रीक्स रु.४१८००-१३२३००/- (S-१५)**

| दिलेले वेतन | | देय वेतन | |
|---|---|---|---|
| स्तंभ-अ | | स्तंभ-ब | |
| वेतनवाढीचा दिनांक | पे मॅट्रीक्स | वेतनवाढीचा दिनांक | पे मॅट्रीक्स |
| ०१/०७/२०१७ | ४८५००/- (S-15/L-6) (शिक्षेपूर्वीचे वेतन) | ०१/०७/२०१७ | ४८५००/- (S-15/L-6) (शिक्षेपूर्वीचे वेतन) |
| ०१/०७/२०१८ आदेश दिनांक ०९/११/२०१७ अन्वये एक वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) | ४८५००/- (S-15/L-6) | ०१/०७/२०१८ आदेश दिनांक ०९/११/२०१७ अन्वये एक वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) | ४८५००/- (S-15/L-6) |
| ---- | ---- | ०१/०७/२०१८ **(शिक्षेचे परिणामस्वरुप काल्पनिक वेतनवाढ)** | ४८५००+ १५००=५००००/- (S-15-L-7) |
| ३०/०६/२०१९ | ४८५००/- (S-15/L-6) | ३०/०६/२०१९ **(३०/०६/२०१९ रोजी शिक्षेतून पुनःस्थापित झाल्याने अनुज्ञेय वेतन)** | ५००००/- |
| ०१/०७/२०१९ आदेश दिनांक २८/०६/२०१८ अन्वये दोन वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) | ४८५००/- (S-15/L-6) | ०१/०७/२०१९ आदेश दिनांक २८/०६/२०१८ अन्वये दोन वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) | ५००००/- (S-15-L-7) |
| ०१/०७/२०२० वरीलप्रमाणे वेतनवाढ रोखणे शिक्षा | ४८५००/- (S-15/L-6) | ०१/०७/२०२० वरीलप्रमाणेवेतनवाढ रोखणे शिक्षा | ५००००/- (S-15-L-7) |

टिप:-सपोनि/श्री.रणधीर यांना आदेश दि.०९/११/१७ अन्वये ०१ वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) असल्याने सदर शिक्षेचा कालावधी दि.०१/०७/२०१८ रोजी सुरु होऊन दि.३०/०६/२०१९ रोजी पूर्ण होईल. त्यामुळे त्यांना दि.०१/०७/२०१९ पासून रु.५००००/- प्रमाणे वेतन देय राहील. परंतु शिक्षेचे परिणामस्वरुप दि.०१/०७/२०१९ ची वेतनवाढ काल्पनिक स्वरूपातील असल्याने असल्याने त्यांना दि.०१/०७/२०१८ ते दि.३०/०६/२०१९ पर्यंतची थकबाकी (रू.४८५००/- ते ५००००/-) देय राहणार नाही. त्यानंतर आदेश दि.२८/०६/२०१८ अन्वये ०२ वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) असल्याने सदर शिक्षेचा कालावधी दि.०१/०७/२०१९ रोजी सुरु होऊन दि.३०/०६/२०२१ रोजी पूर्ण होईल. त्यामुळे पुढील वेतनवाढ दिनांक ०१/०७/२०२१ राहील.

( एम. राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

क्रमांक :- पोअय/सा.आस्था -२ वेतनपडताळणी पेन्शन/ 6453 /२०२०

यवतमाळ , दिनांक :- 05 AUG 2020

**आदेश**

खालील नमुद सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांची वेतन पडताळणी पथ क अमरावती यांचे कडुन पडताळणी करण्यात आली असुन पुढील कार्यवाही करीता पेन्शन लिपीक,लेखा शाखा यांना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|
| १ | सपोउपनि/८३९ ज्ञानेश्वर नेवारे | ३१.०५.२०१९ |

( सुशिला पवार )
प्र.कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय,
यवतमाळ करीता

प्रति,

पेन्शन लिपीक/डिपीजी लिपीक पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ.

प्रत माहीतीस्तव :- आस्थापना लिपीक,आस्थापना शाखा

क्र.: डीपी/३१-बी -२ /पोशि २५५६/अं.आ/ 6502 /२०२० यवतमाळ दिनांक 6 AUG 2020

## अंतीम आदेश

कसूरदार :- १) पोशि/२५५६ संदिप मंडाले नेमणुक - पो.मु.यवतमाळ

कसूरी :-

| अ. क्र | कसुरदार पो.कर्मचारी नाव | पो.स्टे. नाव | गैरहजर पो.नि.कक्ष नोंद दिनांक | प्रस्तावित शिक्षा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | पोशि/२५५६ संदिप मंडाले | पो.मु. यवतमाळ | आपण दि.३०/३/२०१८ रोजी कर्तव्यावर गैरहजर | रु.५००/- आ.दंड |

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेल्या कसुरीबाबत आपणांस क्र. डीपी / 31 -बी / पो.नि.कक्ष /3नोंद संकीर्ण/कसुरी/9183/2018 यवतमाळ दि.11/7/2018 नुसार आपणास स्तंभ क्र.5 नुसार प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी प्रस्तावित का.दा.नो. मधील शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे पोशि/२५५६ **संदिप मंडाले** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत ' **रु.500/-** ' आर्थिक दंड ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ.

प्रति,

१) पोशि/२५५६ संदिप मंडाले मार्फत - राखीव पोलीस निरीक्षक,मुख्यालय,यवतमाळ

2) सदर आदेशाची मूळ प्रत संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची नावानिशी दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- वेतन लिपीक -1/ आस्थापना लिपीक/सआलि -5 / डीपीजी लिपीक/ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

क्र.:डीपी/३१-बी -२ / १६०९ +०५/अं.आ/ 6494 /२०२० यवतमाळ दिनांक 6 AUG 2020

# अंतीम आदेश

<u>कसूरदार</u> :- १) नापोका/१६०९ साहेबराव (पो.मु.) २) पोहवा/११५४ शर्मा (यवतमाळ शहर)
३) पोका/२८७ वासुदेव रुडे (यवतमाळ ग्रा.) ४) पोशि/१६८२ वानखेडे (यवतमाळ शहर)
५) मपोशि/२३१७रुपवती (दिग्रस)

<u>कसूरी</u> :-

| अ. क्र | कसुरदार पो.कर्मचारी नाव | पो.स्टे. नाव | गैरहजर पो.नि.कक्ष नोंद दिनांक | प्रस्तावित शिक्षा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | नापोका/ १६०९ साहेबराव | पो.मु. | दि. ६/८/२०१९ चे ०८.०० पासुन ते ७/८/२०१९ चे ०८.०० वा.दरम्यान आपण मुख्यमंत्री बंदोबस्त मधुन गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष अ.नु.क्र.२० वेळ ११.१५ प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.१०००/- आ.दंड |
| 2 | पोहवा/११५४ शर्मा | यवतमाळ शहर | दि.०९/८/२०१९ रोजी आपली मेन लाईन सराफा,छोटी गुजरी येथे डयुटी लागली असता आपण डयुटीवरुन गैरहजर मिळुन आले. | रु.५००/- आ.दंड |
| 3 | पोका/२८७ वासुदेव रुडे | यवतमाळ ग्रा | दि.१९/८/२०१९ रोजी आपली मा.जिल्हाधिकारी साहेब बंगला येथे डयुटी लागली असता आपण डयुटीवरुन गैरहजर मिळुन आले. | रु.१०००/- आ.दंड |
| 4 | पोशि/१६८२ वानखेडे | यवतमाळ शहर | दि. १/९/२०१९ चे ०८.०० पासुन ते २/९/२०१९ चे ०८.०० वा.दरम्यान आपण गणपती स्थापना मिरवणुक बंदोबस्त मध्ये कर्तव्यावरुन गैरहजर.गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष अ.नु.क्र.३२/१९ वेळ १८.३० प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.१०००/- आ.दंड |
| 5 | मपोशि२३१७ रुपवती | दिग्रस | दि.३०/८/२०१९ रोजी महत्वाची माहीती व पो.स्टे.ला महत्वाचे गुन्हे,जातीय एन.सी.दाखल असुन डी.सी.आर देणेकरीता ३१/८/२०१९ चे ००.०१ वा.पासुन सतत कॉल दिले असता उत्तर मिळाले नाही.त्यामुळे दैनंदिन गुन्हे अहवाल प्राप्त झाला नाही. गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष अ.नु.क्र.०९/१९ वेळ ०७.३० प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.५००/- आ.दंड |

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेल्या कसुरीबाबत आपणांस क्र. डीपी / 31 -बी -2 / पो.नि.कक्ष /1955+14/कसुरी/10788/2019 यवतमाळ दि.16/9/2019 नुसार आपणास स्तंभ क्र.5 नुसार प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी प्रस्तावित का.दा.नो. मधील शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे १) नापोका/१६०९ साहेबराव २) पोका/२८७ वासुदेव रुडे ३) पोशि/१६८२ वानखेडे यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' रु. 1000/- '** आर्थिक दंड ची शिक्षा व ४) मपोशि/२३१७रुपवती ५) पोहवा/११५४ शर्मा यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' रु. 500/- '** आर्थिक दंड ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असती ल तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

प्रति,

१) नापोका/१६०९ साहेबराव
मार्फत - रा.पो.नि.पो.मु.,यवतमाळ

२) पोहवा/११५४ शर्मा ४) पोशि/१६८२ वानखेडे
मार्फत - ठाणेदार, पो.स्टे.यवतमाळ शहर

३) पोका/२८७ वासुदेव रुडे
मार्फत - ठाणेदार पो.स्टे.यवतमाळ ग्रा.

५) मपोशि/२३१७रुपवती
मार्फत - ठाणेदार ,पो.स्टे.दिग्रस

2) सदर आदेशाची मूळ प्रत संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची नावानिशी दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- वेतन लिपीक -1/ आस्थापना लिपीक/सआलि - 1,3,5 / डीपीजी लिपीक/ प्र.अ.पो.नि.कक्ष,यवतमाळ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.